Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

Original Article

साल १९५१ अलबेला चित्रपटातील संगीतकार सी. रामचंद्र यांच्या निवडक गाण्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन

कर्ण सोमनाथ होनमाने[1], डॉ. वैशाली बोदीले[2]
[1]अभ्यासक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
[2]मार्गदर्शक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
Email: karanshonmane@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180719
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 7
Pp. 89-97
July- 2026
Submitted: 15 June. 2026
Revised: 25 June. 2026
Accepted: 10 July. 2026
Published: 31 July. 2026

सारांश

*प्रस्तुत संशोधनात १९५१ सालच्या अलबेला या हिंदी चित्रपटातील संगीतकार **सी. रामचंद्र** यांनी संगीतबद्ध केलेल्या निवडक गीतांचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले आहे. अलबेला चित्रपटातील संगीत हे हिंदी चित्रपटसंगीताच्या सुवर्णकाळातील महत्त्वपूर्ण योगदान मानले जाते. या संशोधनात विशेषतः धीरे से आजा री अखियाँ में निंदिया, बलमा बड़ा नादान रे आणि शोला जो भड़के या गीतांचा राग, ताल, स्वररचना, वाद्यमेळ, भावनिर्मिती आणि प्रसंगानुरूप चालरचना या अंगांनी अभ्यास करण्यात आला आहे. अध्ययनातून असे स्पष्ट होते की सी. रामचंद्र यांनी भारतीय शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत, लोकसंगीत आणि पाश्चात्य संगीत यांचा प्रभावी संगम साधला आहे. गीतांतील स्वर, लय, आलाप, वाद्यमेळ आणि गायनशैली यांच्या माध्यमातून त्यांनी चित्रपटातील प्रसंग व भावनांना प्रभावीपणे संगीतबद्ध केले आहे. तसेच विविध भारतीय व पाश्चात्य वाद्यांचा, कोमल-शुद्ध स्वरांचा आणि अभिनव संगीत प्रयोगांचा परिणामकारक वापर करून गीतांना वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप दिले आहे. संशोधनातून निष्पन्न होते की अलबेला चित्रपटाचे संगीत हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून भारतीय चित्रपटसंगीताच्या विकासातील एक महत्त्वपूर्ण सांगीतिक दस्तऐवज आहे. सी. रामचंद्र यांच्या संगीतशैलीतील प्रयोगशीलता, भावप्रधानता आणि सुरावटीतील नावीन्य यामुळे ही गीते आजही रसिकांच्या मनात लोकप्रिय आहेत.*

मुख्य शब्द: *सी. रामचंद्र, अलबेला, चित्रपटसंगीत, हिंदी चित्रपट, राग, ताल, स्वररचना, भारतीय संगीत, पाश्चात्य संगीत, सांगीतिक विश्लेषण.*

प्रस्तावना :-

भारतीय चित्रपटसृष्टीत संगीताला खूप महत्त्वाचे स्थान आहे. १९४० ते १९६० हा काळ हिंदी चित्रपटसंगीताचा सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. त्यातील १९५० हे दशक संगीताच्या दृष्टीने सुवर्णयुग मानले जाते. याच काळात संगीतकार अनिल विश्वास, नौशाद अली, एस. डी. बर्मन, रोशन, वसंत देसाई, शंकर जयकिशन, मदनमोहन, हेमंत कुमार, ओ. पी. नैयर अशा वेगवेगळ्या संगीतकारांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण संगीतामुळे चित्रपटसंगीतात महत्त्वाचे योगदान दिले.या संगीतकारांपैकी एक महत्त्वाचे नाव म्हणजे संगीतकार सी. रामचंद्र होय. त्यानी रागांवर आधारित गाणी, गजल, कव्वाली, ठुमरी अंगाची गाणी संगीतबद्ध केली. तसेच देशभक्तीवर आधारित गाणी व चित्रपटातील प्रसंगानुसार, विरह गीते, प्रेम गीते, अंगाईगीते अशी गाणी संगीतबद्ध केली. सी. रामचंद्र यांनी हिंदी, मराठी, तमिळ, तेलुगू, भोजपुरी भाषेतील चित्रपटसंगीतात आपले योगदान दिले. सी. रामचंद्रानी संगीत दिलेला १९५१ सालचा हिंदी भाषेतील अलबेला हा एक चित्रपट. या चित्रपटातील संगीत खूप गाजले.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
कर्ण सोमनाथ होनमाने अभ्यासक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर- ४३१००४

How to cite this article:
होनमाने, कर्ण. सोमनाथ. & बोदीले, वैशाली. (2026). साल १९५१ अलबेला चित्रपटातील संगीतकार सी. रामचंद्र यांच्या निवडक गाण्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन. Journal of Research and Development, 18(7), 89–97. https://doi.org/10.5281/zenodo.21942262

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21942262
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

हा चित्रपट संगीताच्या दृष्टीने खूप लोकप्रिय झाला.अलबेला चित्रपटातील संगीत हा सी. रामचंद्रांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. भगवान आर्ट प्रोडक्शन मुंबई या कंपनीने निर्माण केलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शक भगवान पालव तर गीतकार राजेंद्र कृष्ण. चित्रपटातील कलाकार भगवान, गीता बाली, पं. बद्रीप्रसाद, प्रतीमा देवी, दुलारी, बाबूराव. [१] चित्रपटामध्ये मुख्य भूमिकेत भगवान पालव आणि गीता बाली आहेत. चित्रपटात प्यारीलालहा एक गरीब, साधा भोळा पण कलेविषयी प्रचंड ओढ असलेला तरुण व त्याचा अभिनेता बनण्याचा प्रवास दाखवला आहे. कलेच्या वेडामुळे त्याला त्याची नोकरी गमवावी लागते. घरच्या हलाखीच्या परिस्थितीत घरही सोडावे लागते. घर सोडल्यावर तो त्याच्या कष्टावर जिद्दीने मोठा लोकप्रिय कलाकार बनतो चित्रपटातून प्यारीलालचा कलाकार बनण्यासाठी केलेला संघर्ष दाखवला आहे.

अलबेला चित्रपटातील गाणी :-

गजब की निंद है मैफील में मेंरी (लता मंगेशकर आणि मुहम्मद रफी)
धीरे से आजा री अखियन में निंदिया (लता मंगेशकर आणि सी. रामचंद्र)
बलमा बडा नादान रे (लता मंगेशकर)
दिल धड्के नज़र शरमाये तो समझो प्यार होगया (लता मंगेशकर)
हसीनों से मोहोब्बत का बुरा अंजाम होता है (सी. रामचंद्र)
किस्मत की हवा कभी नरम कभी गरम (सी. रामचंद्र)
शाम ढले खिडकीतले (लता मंगेशकर आणि सी. रामचंद्र)
मेरी दिल कि घडी करे टिक टिक (लता मंगेशकर आणि सी. रामचंद्र)
शोला जो भडके दिल मेरा धडके (लता मंगेशकर आणि सी. रामचंद्र)
भोली सूरत दिल के खोटे (लता मंगेशकर आणि सी. रामचंद्र)
दिवाना ये परवाना शम्मा पे आया (लता मंगेशकर आणि सी. रामचंद्र)[२]

हा चित्रपट फक्त अभिनय व कथानकामुळे नाही तर चित्रपटातील प्रभावी संगीतामुळेही लोकप्रिय झाला. या चित्रपटातील गाण्यांनी लोकांच्या मनात आपले वेगळेच स्थान निर्माण केले. आज देखील लोक आवडीने ही गाणी गातात व ऐकतात. अलबेला हा चित्रपट संगीताच्या दृष्टीने खूप लोकप्रिय झाला आहे. या चित्रपटातील गाणी एवढी लोकप्रिय का झाली? त्याच्या मागचा सी. रामचंद्रांचा सांगीतिक विचार काय होता? त्यांची त्यामागची संगीत संकल्पना काय होती? याचा संशोधनाच्या दृष्टीने अभ्यास करणे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामुळे अलबेला चित्रपटातील संगीत फक्त मनोरंजनापुरते मर्यादित नाही, तर संशोधनाच्या द्रुष्टिने ते अभ्यासणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधनात अलबेला चित्रपटातील सी. रामचंद्रांनी संगीतबद्ध केलेल्या निवडक गाण्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात येणार आहे.

संशोधन साहित्याचा आढावा :-

सुभाषचंद्र जाधव यांनी 'तेरे सुर मेरे गीत' या ग्रंथामध्ये सी. रामचंद्रांच्या संगीतनिर्मितीविषयी माहिती दिली आहे. अलबेला चित्रपटातील 'भोली सूरत'व 'धीरे से आजा री' या गाण्यांच्या निर्मिती विषयी चर्चा केली आहे. 'भोली सूरत' मधील् ठेका सी. रामचंद्रांनी एका लग्नात संगीत न शिकलेल्या कलाकाराकडून ऐकून त्यांनी तो गाण्यात कसा वापरला व 'धीरे से आजा री'अंगाईगीत त्यांनी फक्त एका तासातकसे रचले याची विस्ताराने मांडणी केली आहे. [३]

उद्दिष्टे :-

1. अलबेला चित्रपटातील गाण्यांची सांगीतिक वैशिष्ट्ये अभ्यासणे.
2. चित्रपटातील गाण्यांमागची चाल निर्मिती संकल्पना काय आहे ते अभ्यासणे.

गृहितकृत्य :-

1. अलबेला चित्रपटातील संगीतात सी. रामचंद्रांनी भारतीयसंगीत व पाश्चात्यसंगीत यांचा प्रयोग केला आहे.
2. संगीतकाराचे मूळ उद्दिष्ट्य चित्रपटातील प्रसंग, भावनांनुसार गाण्याची चाल तयार करणे असते. सी. रामचंद्रांनी चित्रपटातील प्रसंगांप्रमाणे चाली रचून भावनिक परिणामकारकता साधली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

संशोधन पद्धती :-

1. विश्लेषण पद्धती –
2. श्रवण विश्लेषण पद्धती – गाण्यांची ध्वनीमुद्रणे ऐकून त्यातील चाल, राग, ताल, वाद्यमेळ यांचा अभ्यास करणे.
3. स्वर लिपी अभ्यास - गाण्यांची स्वरलिपी नोटेशन तयार करून त्यांचे अध्ययन करणे.

धीरेसे आजा री अखियन में निंदिया आजा री आजा [४]

गायिका - लता मंगेशकर	गायक - सी. रामचंद्र
राग - पिलू	ताल - दादरा

हे गाणे चित्रपटामध्ये तीन वेगवेगळ्या प्रसंगांप्रमाणे आहे. पहिल्यावेळी विमल तिच्या भावाला झोपी घालताना गाते. दुसऱ्यावेळी प्यारीलाल त्याच्या प्रेयसी आशासाठी गातो तर शेवटी विमल व तिचे वडील गरीबीला त्रासून गातात. त्यानुसार सी. रामचंद्र प्रसंगानुसार मूळ चाल तीच ठेऊन फक्त कडव्यांच्या चाली बदलतात. त्यामुळे तो प्रसंग अधिक स्पष्ट होतो.

गाण्याचा मूळ ताल दादरा आहे. दादरा ताल धा धी ना धा तू ना असा असतो. पण गाण्यात तसा तो न वाजवता त्याच्या वजनाप्रमाणे बोलांमध्ये बदल करून वाजवला आहे.

धीरे से आजा री अखियन में
निंदिया आजा री आजा धीरे से आजा
छुपके से नैनन की बगियन में
निंदिया आजा री आजा धीरे से आजा
धीरे से आजा री अखियन में निंदिया

गाण्यांचे नोटेशन :-

गाणे एक – धीरे से आजा री

१	२	३	४	५	६	१	२	३	४	५	६
X			O			X			O		
धीऽ	रे	से	आ	जाऽ	री	अखि	य	न	में	निंदि	या
ऩप़	ऩी	ऩी	सा	साग़्	रे	सासा	ग़रे	ऩी	सा	ग़्ग्	म़ग्
आ	जा	री	आ	sजा	s	धीऽ	रे	से	आ	sजा	s
रे	म़ग्	सा	ऱेसा	ऩीध़	ऩप़	ऩप़	ऩी	ऩी	सा	sसा	s

हे एक अंगाईगीत आहे. गाण्याची चाल पीलू रागावर आधारित आहे, ज्याची धून लोकसंगीतातूनच येते. राग पिलू हा शांत भाव निर्माण करणारारागअसून कोमल व मधूर असा भावप्रधान राग आहे, जो या अंगाईसाठी अनुकूल आहे.

या गीताची सुरुवात पार्श्वसंगीताने होते. मुळात अंगाईगीत बाळाला झोपवण्यासाठी गायलेजाते. तर मग ते उंच स्वरात किंवा वरच्या आवाजात कसे गायले जाईल? हळुवार पद्धतीने खालच्या आवाजातच गायले जाईल, म्हणून सी. रामचंद्र गाण्याची चाल बांधताना मंद्रसप्तकातूनच चालीची रचना करतात. यात निद्रेला साद घातली आहे. त्यात एक हळुवारपणा, शांतपणा आहे. यात सी. रामचंद्र चाल पण तशीच बांधतात. गाण्याची सुरुवात मंद्रसप्तकातील मध्यम पासून सावकाश हळुवारपणे सुरू होते आणि अलगद षड्जावर येऊन विसावते. गाण्यातील शांतपणाव त्यातील कोमलता दर्शवण्यासाठी कोमल गंधाराचे प्रयोजन केलेले दिसते.

गाण्यात विमल आपल्या भावाला, प्यारीलाल यांना झोपवण्यासाठी झोपेला बोलवते आहे. हळुवारपणे नकळत ये अलगद ये आणि डोळ्यात येऊन बस अशी विनवणी करते. फक्त येऊ नको तर येताना तुझ्याबरोबर सुंदर स्वप्नांच्या कळ्या, स्वप्नांची सुंदर फुले घेउन ये जेणेकरून शांतपणे गाढ झोप लागेल. आजा री आजा या शब्दात विनवणी, प्रार्थना केली आहे. त्याचप्रमाणे ती चाल पण मध्य रिषभ वरून खाली उतरत उतरत मंद्रात मध्यम वर येते. मुखड्याची चाल मंद्रसप्तकातील मध्यम ते मध्यसप्तकातील गांधार एवढ्यात बांधलेली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

लेकर सुहाने सपनोंकी कलियाँ
आ के बसा दे पलकोंकी गलियाँ
पलकोंकी छोटीसी गलियन में
निंदिया आजा री आजा

कडव्याची सुरुवात आलापाने होते. या ठिकाणी सी. रामचंद्र चाल बदलतात. येथे त्यांनी शुद्ध गंधार वापरलेला आहे. शुद्ध गंधार नवीन आशा, नवीन स्वप्न, नविन भविष्याची उमेद घेऊन येणारा आहे. सपनोंकी कलियाँ आणि पलकोंकी गलियाँ या ओळींमध्ये सपनों व पलकों यात लयकारी केली आहेत.

१	२	३	४	५	६	१	२	३	४	५	६
X			O			X			O		
सप	नोंऽ	की	कलि	ऽयां	ऽ						
मप	मप	ग	रेसा	रेरे	ऽ						
सप	ऽनों	ऽ	की	ऽक	लि	यां	ऽ	ऽ			
गम	गम	पम	गरेसा	ऽरे	सा	सा	ऽ	ऽ			
सप	नोंऽ	कीऽ	कलि	ऽयां	ऽ						
मनी्	नी्ध	धप	पम	पप	म						

गाण्यात सपनोंकी कलियाँ या शब्दांची वेगवेगळ्या सुरावटीत लय बदलून पुनरावृत्ती केली आहे. पहिल्या संगतीत शब्द मध्यमला सुरू होऊन रिषभ वर संपतात. दुसऱ्यांदा गंधारावर सुरू होऊन षड्जावर संपतो तर तिसऱ्यावेळी मध्यम वर सुरू होऊन पंचम वर संपवले आहे. त्यामुळे गाण्यातील भावनात्मक परिणाम अधिकाधिक वाढलेला दिसतो.

लेकर सुहाने व तारोंसे चोरी या दोन्ही कडव्यांची चाल सारखीच आहे. दोन्ही कडव्यांची चाल मंद्र मध्यम ते मध्यसप्तकातील कोमल निषाद एवढ्यात बांधलेली आहे.

जगती है अँखिया सोती है किस्मत
दुश्मन गरीबों की होती है किस्मत
दमभर गरीबों की कुटियन में
निंदिया आजा री आजा

'जगती है अँखिया सोती है किस्मत' हे कडवे चित्रपटात विमल आणि प्यारीलालचे वडीलगरीबीने त्रासून गेलेले - यातून गरीबांचे दु:ख, त्यांच्या व्यथा मांडलेल्या आहेत. सी. रामचंद्रांनी येथे गाण्याची चालही तशीच बदललेली आहे. कडव्याची सुरुवात आलापाने होते. कडवे मध्यसप्तकातील मध्यम पासून सुरू होते.

त्यातील दुख, करूण रस दर्शवण्यासाठी कडव्यात कोमल व शुद्ध असे दोन्ही गंधारवापरले आहेत. 'जगती है अँखिया सोती है किस्मत' या ओळीत अँखिया मध्ये कोमल गंधार अणि सोती है यात शुद्ध गंधार तसेच होती है किस्मत यात कोमल आणि सोती है किस्मत यात शुद्ध गंधारचे प्रयोजन दिसते.

१	२	३	४	५	६	१	२	३	४	५	६
X			O			X			O		
दुश	मन	ग	री	बोंऽ	ऽऽ	की	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ
रेम	मम	म	पधधप	धसा`	नी्ध	प	ऽ	ऽ	मग	रेसा	रेग्
हो	तीऽ	है	किस्	म	त	सो	तीऽ	है	किस्	म	त
ग्	रेग्	सा	सासा	रे	ग	ग	रेग्ग	सा	सासा	सा	सा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

या ओळीत प्रयत्न करूनही नशीब साथ देत नाही. नशीबाला शत्रू संबोधून त्यावरील संताप व्यक्त करताना चाल पण त्यानुसार रे म संगती घेऊन मध्यम वरून चढत तार षडजावर जाऊन पंचमवर येऊन मध्य षड्जावर संपते. गाण्यातील वेदना त्यातील करूण रस निर्मितीसाठी व्हायोलिन वर क्रोमॅटीकल सुरांचा प्रयोग केलेला आहे.

'जगती है अँखिया सोती है किस्मत' व 'आँखे तो सबकी है एक जैसी' या दोन्ही कडव्यांची चाल सारखीच आहे. या कडव्यांच्या चालीची बांधणी सी. रामचंद्र मंद्रसप्तकातील मध्यम ते तारसप्तकातील षड्ज पर्यंत अशी तिन्ही सप्तकात रचतात.

या गाण्यात षड्ज, शुद्ध रिषभ, कोमल गंधार, शुद्ध गंधार, शुद्ध मध्यम, पंचम, शुद्ध धैवत, कोमल निषाद, शुद्ध निषाद या स्वरांचा प्रयोग केला आहे.

मुखड्यामध्ये कोमल गंधार आणि 'लेकर सुहाने'या कडव्यामध्ये शुद्ध गंधारचा प्रयोग केला आहे, तर'जगती है अँखियां' या कडव्यामध्ये कोमल व शुद्ध असे दोन्ही गंधार वापरलेले आहेत. मुखड्यामध्ये शुद्ध निषाद व कडव्यात कोमल निषाद वापरला आहे. पूर्ण गाण्याची चाल मंद्रसप्तकातील मध्यम ते तार षड्ज अशी तिन्ही सप्तकात बांधलेली आहे.

गाण्यात तंतूवाद्य सतार, व्हायोलिन, स्ट्रिंग तर सुशीरवाद्य बासरी तर तालवाद्य तबला यांचा प्रयोग केला आहे. गाण्यात बासरी व व्हायोलिनचा प्रभावी वापर केलेला दिसतो. गाण्यातील कोमलता, शांतपणा तसेच दु:ख वेदना त्यातील करूणभाव भावनिर्मितीसाठी ही वाद्ये उपयुक्त ठरलेली दिसतात.

गाण्याच्या प्रत्येक कडव्याच्या प्रारंभीस आलापाचा वापर केलेला आहे.

आलाप

१	२	३	४	५	६	१	२	३	४	५	६
X			O			X			O		
सा	s	रेप	म	sग	सारे	सा	s	s			

लेकर सुहाने या कडव्यांचा आलाप मध्य षड्ज वर सुरू होतो व पंचम वर जाउन खाली परत षड्ज वर संपतो. त्यातील शुद्धगंधार सकारात्मकता आणि नवीन आशावाद घेऊन येणारा आहे. आलापात शुद्ध गंधार वापरलेला आहे

आलाप

१	२	३	४	५	६	१	२	३	४	५	६
X			O			X			O		
प	s	s	s	मप	ग्म						

'जगती है अँखिया' या कडव्याच्या सुरवातीचा आलाप पंचम पासून सुरू होतो. आलापातील योजलेला कोमल गंधार त्यातील करुणभाव निर्माण करणारा आहे. गाण्यात आलापाचा परिणामकारक वापर केल्यामुळे त्यातील भावपूर्णता वाढलेली दिसते.

हे अंगाईगीत लता मंगेशकर व सी. रामचंद्र यांनी गायले आहे. या अंगाईगीतासाठी लाभलेला लता मंगेशकरांचा मधुर व दैवी आवाज तसेच त्यातील स्त्रीसुलभतेमुळे अंगाईगीतातील वात्सल्य, माया प्रेम, जिव्हाळा अशा भावनांचे प्रकटीकरण झालेले दिसते.

बलमा बडा नादान रे [५]

गायिका लता मंगेशकर

ताल केरवा

बलमा बडा नादान रे
प्रीत की ना जाने पहचान रे

'बलमा बडा नादान रे' हे ठुमरी अंगाचे गाणे आहे. ठुमरी म्हणजेच भाव, प्रेम आणि नजाकता यांचे मिश्रण. यामध्ये प्रेमातील आकर्षण, मिलनाचा आनंद, प्रियकरव प्रेयसीमधील संवाद, प्रेमातील समर्पण, प्रिय व्यक्तीदुरावल्याने निर्माण होणारा विरह आणि नाजूक भावभावनांचे प्रभावी चित्रण आढळते. आशा तिच्या प्रियकराला तिचे प्रेम समजत नसल्याने गाण्यातून प्रियकराची तक्रार करत आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

गाण्यातून प्रेमातील निरागसता, भोळेपणा, निष्पापपणा मांडला आहे. आशाचा प्रियकर प्रेमाविषयीसाधा भोळा, नादान आहे. त्याला तिचे प्रेम समजत नाही. ती त्याला वेगवेगळ्या प्रकारे प्रेम समजवण्याचा प्रयत्न करते. प्रियकराला तिचे प्रेम कळत नसल्याने तिच्या व्यथा, तिला होणारा त्रास, तिचे दु:ख या गाण्यातून आशा मांडते.

'बलमा बडा नादान रे' हे गाण सी.रामचंद्रांनी केरवा तालात तालबद्ध केले आहे. केरवा तालाचे बोल धा गे न ती न क धी न हे आहेत. परंतू गाण्यात मूळ बोल न वाजवता त्याच्या वजनाप्रमाणे बोलांमध्ये बदल करून ताल वाजवला आहेत.

गाण्याची सुरुवात पार्श्वसंगीताने होते. गाणे षड्जापासून सुरू होते. गाण्याची पहिली ओळ सातव्या मात्रेवर तर दुसरी ओळ दुसऱ्या मात्रेपासून सुरू होते.

१	२	३	४	५	६	७	८	१	२	३	४	५	६	७	८
X				O				X				O			
	प्रीऽ	त	की	ना	ऽ	जाऽ	ऽऽ	ने	ऽ		प	ह	चा	ऽ	न
	साग	ग	म	प	ऽ	म'प	धप	म	रे		रे	ग	म	ऽ	ध

'प्रीत की ना जाने पहचान रे' या ओळीत ना जाने शब्दासाठी तीव्र व शुद्ध असे दोन्ही मध्यम वापरले आहेत. मुखड्याची चाल मंद्र धैवत ते मध्य धैवत एवढ्यात बांधलेली आहे.

कडवे दुसऱ्या मात्रेपासून सुरू होते. कडव्याची चाल पंचम पासून उचललेली आहे.

१	२	३	४	५	६	७	८	१	२	३	४	५	६	७	८
X				O				X				O			
	बै	यां	ऽ	प	क	डूं	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽऽ	ऽऽ	ऽऽ	ऽऽ	ऽ
	पम'धप	ग	म	प	म'	प	ऽ	ऽ	ऽ	म'ध	पम	गरे	साग	रेग	सा

मुळात प्रेम ही भावना मोजून मापून किंव्हा कोणत्या बंधनात बांधून केली जात नाही. प्रेम एखाद्या साच्यात, चौकटीत बसवून केले जात नाही. मग ती भावना पूर्णपणे तालात तरी कशी बांधलेली असेल? त्याप्रमाणे ती चाल मात्रा ते मात्रा न जाता त्यातील लांबवलेला आलाप तालाच्या पुढे पुढे जातो. "बैया पकडूं' मध्ये शुद्ध आणि तीव्र दोन्ही मध्यमांचा प्रयोग केला आहे.

समझत नाही, कैसे समझाऊँ

१	२	३	४	५	६	७	८	१	२	३	४	५	६	७	८
X				O				X				O			
	स	मझ	त	नाऽ	ऽ	ही	कै	ऽ	से	स	म	झा	ऽ	ऊं	ऽ
	ग	पप	प	पध	सा'नी्	ध	प	ऽ	ध	म	ग	म	प	प	ऽ
	स	मझ	त	ना	ऽ	ही	कै	ऽ	से	स	म	झा	ऽ	ऊं	ऽ
	ग	पध	सा'	नी्	सा'नी्	ध	पप	ऽ	ध	म	ग	म	प	प	ऽ

आशाने वेगवेगळ्या प्रकारे खुणावून इशारा करून देखील त्याला तिचे प्रेम समजत नाही. तिने लाखोवेळा प्रयत्न करूनही त्याला तिचे प्रेम कळत नसल्याने तिने हार मानली आहे. आता समजत नाही कैसे समझाऊ यातील तिची हतबलता, तिची असहाय्यता दाखवण्यासाठी सी. रामचंद्रांनी समझत नाही याची दोन प्रकारे चाल बांधलेली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

पहिली गंधारला सुरू होऊन चाल कोमल निषाद पर्यंत जाऊन धैवतावर संपते. तर दुसऱ्या वेळेस चाल हताश झालेला हा भाव व्यक्त करण्यासाठी गंधार पासून चढत तार षड्जावर जाते व पंचम वर संपते.

१	२	३	४	५	६	७	८	१	२	३	४	५	६	७	८
X				O				X				O			
	लाऽ	ख	ज	त	नऽ	कीऽ	येऽ								
	पनी	नी	सा'	ीसा'	सा'नी्	नी्ध	धप								

लाख जतन किये यात सी. रामचंद्र कोमल व शुद्ध या दोन्ही निषादचा वापर करतात.

१	२	३	४	५	६	७	८	१	२	३	४	५	६	७	८
X				O				X				O			
	हा	sर	ग	ई	s	मैं	s								
	प	धध	ध	प	म	म	नी्								

अनेक उपाय करून प्रयत्नकरूनही त्याला तिचे प्रेम समजत नाही. तिचे सर्व उपाय अयशस्वी ठरतात. आता तिने हार मानली आहे. प्रयत्न करून करून ती थकली आहे. ती त्याप्रमाणे लाख जतन किये यासाठी वर चढलेली चाल हार गयी येथे चाल खाली येते.

१	२	३	४	५	६	७	८	१	२	३	४	५	६	७	८
X				O				X				O			
रो	s	के	s	हो	s	ग	ई	जा	s	s	न	रे	s		
नी्	ध	ध	प	प	म	म	प	ग	s	s	ंम	रे	सा		

रोके यातील तिचे दु:ख तिला होणाऱ्या वेदना दर्शविण्यासाठी सी. रामचंद्र कोमल निषादचे प्रयोजन करतात. जेव्हा रडून रडून जिव कासावीस होतो. आता समजून सांगायची क्षमता उरलेली नसती ती थकलेली असताना वरच्या स्वरात आवाज उंचाऊन बोलायची ताकद कशी राहील? आवाज आपोआपच खोल जात असतो त्याप्रमाणे सी. रामचंद्र चाल पण अवरोही कोमल निषाद वरून खाली उतरवत मध्य षड्जवर आणतात. कडव्यात शुद्ध व तीव्र दोन्ही मध्यम तसेच शुद्ध व कोमल निषाद असे दोन्ही निषाद वापरले आहेत. पहिल्या कडव्याची चाल षड्ज ते तार षड्ज एवढ्यात बांधलेली आहे.

दुसऱ्या कडव्याची सुरुवात पंचम पासून होते.

बेदर्दी संग नाता लागा

१	२	३	४	५	६	७	८	१	२	३	४	५	६	७	८
X				O				X				O			
	मे	sरी	प्रीऽ	s	त	का	s	s	भा	sग	न	जा	s	गा	s
	म	धध	धनी	सा'	नी	सा'	s	s	नी	sध	प	ध	म	प	मध
मे	री	पॉज	प्रीऽ	s	त	काऽ	ऽऽ	ऽऽ	भा	sग	न	जा	s	गा	s
ध	ध	पॉज	धनी	सा'	सा'	नीसा'	रे'सा'	रे'नी	नी	sध	प	ध	मप	प	s

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

आशा म्हणते की तिचेनाते, तिच्या भावना न समजणाऱ्या अशा कठोर व्यक्तीसोबत जोडले गेले आहे, की ज्याला तिच्या प्रेमाची कदर नाही. आशा स्वत:च्याच नशीबाला दोष देत आपले दु:ख मांडते.

'मेरी प्रीत का भाग न जागा' याची चाल सी.रामचंद्रांनी वेगवेगळया दोन प्रकारे बांधलेली आहे. तिचं दुख, प्रियकराला तिचे प्रेम न समजल्याने तिला होणारा त्रास, तिच्या व्यथा मांडताना चाल पण मध्य सप्तकातील मध्यम पासून पहिल्यांदा आरोही चढतचढत तार षड्जापर्यंत जाते, तर दुसऱ्या वेळेस मध्यसप्तकातील धैवत पासून तार रिषभ वर जाते.

दुसऱ्या कडव्याची चाल मध्य षड्ज ते तार रिषभ पर्यंत बांधलेली आहे. पहिल्या व दुसऱ्या दोन्ही कडव्यांची चाल वेगळी वेगळी रचलेली आहे.

सी. रामचंद्रांनी पहिल्या कडव्यातील शेवटची ओळ 'मै रोके हो गयी जान रे' व दुसऱ्या कडव्यातील शेवटची ओळ 'अब तो मेरी मान रे' या दोन्ही ओळींच्या चालीची रचना अशी केली आहे की मुखडा उचलण्यासाठी त्या ओळी कोमल निषाद वरून उतरत ती चाल षड्जावर येते आणि मुखडा उचलला जातो. गाण्याची रचना सी. रामचंद्रांनी तिन्ही सप्तकात केलेली आहे. पूर्ण गाणे मंद्र धैवत ते तार रिषभ एवढ्यात रचलेले आहे. गाण्यात षड्ज, शुद्ध रिषभ, शुद्ध गंधार, शुद्ध मध्यम, तीव्र मध्यम, पंचम, शूद्ध धैवत, कोमल निषाद, शुद्ध निषाद या सूरांचा प्रयोग केला आहे.

गाण्यात व्हायोलिन, बासरी, तबला अशा वाद्यांचा प्रयोग केला आहे. गाण्यात व्हायोलिनचा प्रभावी वापर केलेला दिसतो. त्यावर विब्राटो तंत्राचा वापर केलेला आहे. व्हायोलिनच्या सूक्ष्म सुरात कंपन युक्त सुरांचा प्रयोग केल्यामुळे गाण्यात शांत, गंभीर भाव निर्माण होतो.

शोला जो भडके दिल मेंरा धडके [६]

गायिका लता मंगेशकर, गायक सी. रामचंद्र

हे अलबेला चित्रपटातील अत्यंत लोकप्रिय, सदाबहार, नृत्यप्रधान गीत आहे. या गाण्यात हलकाफुलका रोमँस आणि पाश्चात्य ताल पद्धतीचा वापर केला आहे. टू बाय फोर बिट्सचा हा ताल. तो गाण्यातील नृत्यासाठी ऊर्जा, नवचैतन्य मिळूवून देणारा आहे. विशेषतः भगवान पालव यांच्या अनोख्या नृत्यशैलीमुळे हे गाणे खूप प्रसिद्ध झाले. या गाण्यात प्रेम, आकर्षण आणि उत्साह व्यक्त होतो. गाण्याची सुरुवात पार्श्वसंगीताने होते. गाण्याच्या सुरवातीला आणि शेवटी टाळयांचा प्रयोग केला आहे. वेगवेगळे छंद तयार करून वाजवलेल्या टाळयांमुळे गाण्यात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण होते. गाण पंचम पासून सुरू होत व पंचमवरच शेवट होतो.

गाण्यात द्रुतलयीच्या प्रयोगामुळे नृत्यासाठी उत्साहपूर्ण वातावरण टिकून राहते. द्रुत लयीमुळे नृत्यास गती व ऊर्जा मिळते. द्रुतलयीमुळे गाण्याचा श्रोत्यांवर होणारा परिणाम दीर्घकाळासाठी राहतो. श्रोत्यांच्या मनावर गाणे एक वेगळीच छाप टाकून जाते.

मुखड्याची चाल मध्य गंधार ते तार षड्ज एवढ्यात बांधलेली आहे. पहीले कडवे तारसप्तकातील षड्जापासून सुरू होते.

तिसऱ्या कडव्याची सुरुवात तारसप्तकातील गंधारापासून होते. सी. रामचंद्रांनी पहिल्या व दुसऱ्या कडव्याची चाल सारखी तयार केलेली आहे. तर तिसऱ्या कडव्याची चाल वेगळी बांधलेली आहे. पूर्ण गाण्याची रचना मध्य गंधार ते तार गंधार एवढ्यात रचली आहे. गाण्यात काही ठिकाणी एकाच स्वरावर अनेक शब्दांची रचना केलेली आहे. जसे 'शोला जो भडके' पंचम स्वरावर, 'महकी हवाएं' तार षड्जावर, 'ऐसे में थाम लो' निषाद वर, 'पत्ता भी खडके तो' पंचम वर, 'प्यार को मेरे' तार षड्ज वर, 'याद ये किसकी' पंचम वर, 'अब तो न होंगे' निषाद वर, 'जी ना सकेंगे तुमसे' पंचम स्वर अशा पद्धतीने गाण्यात षड्ज, रिषभ, गंधार, मध्यम, पंचम, धैवत, निषाद असे सर्व शुद्ध स्वर वापरले आहेत. हे गाणे बिलावल थाटावर आधारित आहे. गाण्यात सी. रामचंद्रांनी जास्तीत जास्त खडे स्वर वापरले आहेत.

गाण्यात कोंगो, बोंगो, तबला, ड्रम्स, अशी वाद्ये वाजवली आहेत. चालीतील साधेपणा आणि सुरावटीतील सहजता व पाश्चात्य वाद्यांच्या केलेल्या प्रयोगामुळे गाणे ठेका धरून नाचायला भाग पाडते.

गाण्यात पहिल्या दोन कडव्यानंतर येणाऱ्या मुखड्यात व तिसऱ्या कडव्याच्या शेवटच्या ओळीत आणि गाण्याच्या शेवटी कोरसचा प्रभावी वापर केला आहे. कोरसच्या समूहगायनामुळे गाण्यात आनंदमय वातावरण तयार होते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

निष्कर्ष :

अलबेला चित्रपटातील संगीतात सी. रामचंद्रांनी भारतीयसंगीत, पाश्चात्यसंगीत यांचा प्रयोग केला आहे. हारमोनियम, पियानो, ढोलक, तबला, कोंगोबोंगो, ड्रमसेट, घुंगरू, गिटार, सतार, व्हायोलिन, बासरी, जलतरंग, क्लॅरियोनेट ट्रंपेट या भारतीय तसेच पाश्चात्य वाद्यांचा प्रयोग केला आहे. तसेच भांड्यांचा आवाज, घड्याळाची टीकटीक, टाळ्यांचा प्रयोग अशा विविध असंगीतमय आवाजांचा प्रयोग केल्याने त्यांच्या संगीतातील वेगळेपण व त्यातील त्यांची प्रयोगशीलता दिसून येते. अलबेला चित्रपटातील संगीतात स्केल बदलून संगीत तयार केले आहे. एकाच स्वराची शुद्ध व कोमल अशी दोन्ही रुपे वापरलेली दिसतात. जसे की 'बलमा बडा नादान रे' मध्ये शुद्ध व तीव्र मध्यम आणि कोमल व शुद्ध निषाद वापरले आहेत. 'धीरे से आजा री' मध्ये कोमल व शुद्ध गंधार वापरला आहे. अलबेला चित्रपटात सी. रामचंद्रांनी अंगाईगीत, कव्वालीवर आधारित, प्रेमगीत, नृत्यप्रधान गाणी अशी वेगवेगळ्या प्रकारची गाणी संगीतबद्ध केली आहे. तसेच शास्त्रीयसंगीत, उपशास्त्रीयसंगीत व पाश्चात्यसंगीत अशा संगीतप्रकारांवर आधारित गाणी संगीतबद्ध केली आहेत. सी. रामचंद्रांच्या संगीतात सा प, म नी, प सा, रे, म, सा री प, अशा स्वरसंगतींचा प्रयोग केलेला आढळतो. तसेच कणस्वर, खटका, हरकत, मींड यांचा सौंदर्यपुर्ण वापर केलेला दिसतो. सी. रामचंद्रांच्या संगीतात गाण्यातील शब्दाच्या भावाप्रमाणे सुरांचे प्रयोजन केलेले दिसते त्यांच्या संगीतात स्वर आणि शब्द यात एकजीवपणा आढळतो. नाविन्यपूर्ण संगीत, अर्थपूर्ण गीत आणि प्रभावी सादरीकरण यामुळे अलबेला चित्रपटाचे संगीत खूप लोकप्रिय झाले. आजदेखील पंच्याहत्तर वर्षानंतरही ही गाणी लोकांच्या मनावर राज्य करत आहेत. म्हणून अलबेला चित्रपट सी. रामचंद्रांच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा चित्रपट ठरला.

संदर्भ

1. फिल्मोग्राफी : विश्वास नेरूरकर
2. https://youtu.be/-34xnhbnJpo?si=NW82xTQkFewn_WeS
3. तेरे सुर मेरे गीत शुभाषचंद्र जाधव प्रतीक प्रकाशन
4. https://youtu.be/1d7g6FUIj0M?si=GTakShocE9QNqqpj
5. https://youtu.be/rT6hWfHbo6E?si=qqGqgxGUBZjQL0GV
6. https://youtu.be/8MtS6QdyYDQ?si=bkeStDFLy23ctepY